स्थायी समितीच्या मंगळवार दिनांक 07–11–2017 रोजी दुपारी 03–00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. संदिप चंद्रभान जाधव | सभापती |
| 2. | श्रीमती संगीता दिपक गिऱ्हे | सदस्या |
| 3. | श्रीमती रिता अशोक मुळे | सदस्या |
| 4. | श्रीमती उषा टॉबी पॅलट | सदस्या |
| 5. | श्रीमती दुर्गा चंद्रभुषण हत्तीठेले | सदस्या |
| 6. | श्रीमती भाग्यश्री गणेश कानतोडे | सदस्या |
| 7. | श्रीमती नेहा नरेन्द्र वाघमारे | सदस्या |
| 8. | श्रीमती सरला कमलेश नायक | सदस्या |
| 9. | श्रीमती मनिषा सुनिल कोठे | सदस्या |
| 10. | श्रीमती सरिता ईश्वर कावरे | सदस्या |
| 11. | श्रीमती लता सुनिल काडगाये | सदस्या |
| 12. | श्रीमती जयश्री मोहन वाडीभस्मे | सदस्या |
| 13. | श्री. जितेन्द्र भास्कर घोडेस्वार | सदस्य |
| 14. | श्री. हरीश मोहन ग्वालबंशी | सदस्य |
| 15. | श्रीमती अंसारी सय्यदा बेगम मो.निजामुद्दीन | सदस्या |
| 16. | श्री. मनोज दशरथ सांगोळे | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. रविन्द्र कुंभारे, अति. आयुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 207ः– {वाहतूक विभाग} नागपूर शहरातील वाहतुकीचे कोंडीबाबत मा. उच्च न्यायालय मुंबई, नागपूर खंडपीठ यांनी जनहित याचिका क्र. ५/२०१६ मध्ये वाहतुकीची कोंडी संपृष्टात आणण्याकरिताचे निर्देशाप्रमाणे विस्तृत पार्कींग व्यवस्थापन करिता विस्तृत प्रकल्प अहवाल तयार करावयाचा आहे. या विस्तृत पार्कींग प्रकल्प अहवालामध्ये प्रामुख्याने खालील बाबी समाविष्ट आहेत. शहरातील मुख्यभाग, मुख्य भागालगत असलेले मुख्य तसेच लहान रस्ते या ठिकाणी सार्वजनिक पार्कींगची व्यवस्था करणे, नो पार्कींग व पार्कींगची जागा ठरविणे, रस्त्याच्या बाजुला पार्कींग स्थळ ठरविणे, रस्त्यावर व्यवस्थित रित्या पार्कींगची व्यवस्था करणे इ. बाबींचा समावेश आहे. त्याकरिता नागपूर शहराकरिता तयार करण्यात आलेल्या पार्कींग पॉलीसी च्या धर्तीवर

विस्तृत पार्कींग व्यवस्थापनेसाठी प्रकल्प अहवाल तयार करण्याकरिता वाटाघाटीनंतर रुपये ७०.०० लक्ष अधिक जी.एस.टी. च्या रकमेवर मे. यु.एम.टी.सी. हैद्राबाद यांची नेमणूक करणे तसेच पद क्र. ४०२००४४०७०१ अंतर्गत तरतुद मुक्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन मे. यु.एम.टी.सी., हैदराबाद या कंपनीस हे काम परस्पर दयावयाचे आहे का हा खुलासा विभागाने स्पष्ट केला नाही. तसेच अश्या प्रकारची अर्धशासकीय कंपनी भारतात इतरत्र नाही का ? किंवा या प्रकरणात निविदा करु शकत नाही का ? या बाबत स्पष्ट अभिप्राय सादर करावा व पुढील स्थायी समितीत प्रस्ताव सादर करावा या सुचनेससह विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 208ः– {लोककर्म झोन 04} प्रभाग क्र. १७–ब अंतर्गत राजाबक्षा टेम्पल गेट येथील श्री टाकसांडे ते मनिषा हार्डवेअर आणि श्री फेन्डर यांचे घरापर्यंत सिमेंटीकरण करण्याच्या कामास्तव रू. ४५,६४,८०८/– च्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 209ः– {लोककर्म झोन 09} प्रभाग क्र. 6 (अ) अंतर्गत सुदाम नगर, यादव नगर, महेंद्र नगर, येथे भुमिगत आर.सी.सी. पाईप लाईन टाकण्याच्या रु. 35,93,835/– रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करून निविदा मागविण्यास मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 210ः– {लोककर्म झोन 10} प्रभाग क्र १ ड अंतर्गत जरिपटका पोलीस स्टेशन रिंग रोड चौक ते नारा घाटा पर्यंत भुमिगत पावसाळी पाईप लाईन टाकण्याबाबत रू. ३५,२१,४२०/– (पसतीस लक्ष एकवीस हजार चारशे विस रू.फक्त ) जुने पद क्रमांक ६३१ व नविन पद क्र. A४२४०१३७०८२६ अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 211ः– {लोककर्म झोन 08} प्रभाग क्र. 23 ड हिवरी कोठा येथे पावर हाऊस बाजूला सिमेंट कॉक्रीट रस्त्याचे बांधकाम करण्याचे काम करण्यास्तव रु 29,57,391/– रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 212ः– {लोककर्म झोन 05} प्रभाग क्र. 26 – क अंतर्गत शक्तीमाता नगर व शेष नगर येथील रोडचे रूंदीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रूपये 26,51,210/– च्या प्राकलनास प्रशासकिय मान्यता प्रदान करणे व निविदा मागविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 213:— प्रभाग क्र. 26 — क अंतर्गत शक्तीमाता नगर नाला ते श्री
{लोककर्म झोन 05} गोरडे यांचे घरापर्यंत सिमेंट रोडचे बांधकामाचे रूपये 49,98,260/— च्या प्राकलनास प्रशासकिय मान्यता प्रदान करणे व निविदा मागविण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 214:— नागपुर शहरातील डाबंरी रस्त्याचा दुरावस्थेबाबत
{लोककर्म झोन 08} लोकप्रतिनिधी व नागरिकाकडुन प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने, रस्त्याचे दोष दायित्व कालावधी संपुष्टात न आलेल्या ३९८ कामाची पाहणी करण्यात आली असता एकुण १८ रस्त्यांचा कामामध्ये दोष आढळले त्यामुळे सम्बंधित ठेकेदार मे. ओ.जी. बजाज, यांचे सह (१) मे. अमृत कंस्ट्रक्शन (२) मे. प्रेमचंद राचुमल (३) मे. आर.एम. गोपलानी (४) मे. पी.एम.ए. कंस्ट्रक्शन (५) मे. अंकिता कंस्ट्रक्शन (६) मे. सेठ कंस्ट्रक्शन (७) मे. फोनिक्स इंजिनिअरींग (८) मे. एल.सी. गुरबक्षानी (९) मे. अमृता कंस्ट्रक्शन या सर्व कत्राटदाराचे असेल त्या वर्गाच्या एक एक वर्ग खाली तिन महिण्याकरीता स्थायी समिती यांचे ठराव क्र ७०६ दिनांक ०५.११.२०१६ अन्वये पदावतन करण्यात आलेले होते.

तसेच स्थायी समितीने कत्राटदारास खालील बाबीचे पूर्तता करण्याचे निर्देश दिलेले होते.

१) दोषदायित्व कालाधितील कामे जर दोषपूर्ण असेल तर एका महिण्यात संम्बधित कत्राटदाराने गुणवत्तापूर्वक कामाची दुरूस्ती करणे.
२) कंत्राटदाराने हॉटमिक्स प्लान्ट डी.एम. ६० लावणे.
३) कंत्राटदाराने हॉटमिक्स प्लान्टचे फिटनेस सर्टिफिकेट देणे

मा. स्थायी समितीच्या वरील नमुद निर्णयाप्रमाणे मे. अमृत कंस्ट्रक्शन यांचे वर्ग २ असलेले पंजिकरण वर्ग ३ मध्ये करण्यात आलेले होते. परंन्तु मे. अमृत कंस्ट्रक्शन यांनी त्यांनी केलेल्या दोषपुर्ण कामाची गुणवत्तापुर्वक दुरूस्ती केल्यामुळे तसेच स्थायी समितीच्या दिलेल्या वरील निर्देशाचे अनुपालन केल्यामुळे मे. अमृता कंस्ट्रक्शन, यांचा वर्ग .३ मध्ये केलेले पदावतन करण्याचा निर्णय मागे घेवुन त्यांचे पंजिकरण मुळ वर्ग .२ मध्ये कायम ठेवण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवुन,

तसेच इतर कत्रांटदाराबाबत जर कत्रांटदाराने स्थायी समितीच्या ठराव क्र. ७०६दिनांक ०५.११.२०१६ च्या अटिची पूर्तता करीत असेल तर त्यांचे पंजीकरण पुर्ववत करण्याबाबत निर्णय घेण्याकरीता मा. मुख्य अभियंता यांना प्रधिकृत करण्याबाबत निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन स्थायी समिती ठराव क्र. 706 दिनांक 05.11.2016 निर्देशाप्रमाणे मुख्य अभियंता यांनी कार्यवाही करावी या सुचनेसह विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 215:— प्रभाग क्र ११ अ अन्नाबाबनगर ते आशिर्वाद शाळेपर्यंत
{लोककर्म झोन 10} रस्त्यांचे रूंदीकरण व सी.सी. रोडचे काम करण्याबाबत रू. ७४,८१,५८५/— (चौऱ्याहत्तर लक्ष एकयांशी हजार पाचशे पंच्यांशी रू. फक्त) जुने पद क्रमांक ६७९ व नविन पद क्र. A४२००१४७०५११ अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 216:– प्रभाग क्र. १७–ब अंतर्गत वंजारी नगर मैदान परिसरात {लोककर्म झोन 04} रस्त्याचे सिमेंटीकरण करण्याच्या कामास्तव रू. ४३,९६,२८२/– च्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली

ठराव क्रमांक 217:– प्रभाग क्र. 03 मॉ. बम्लेश्वरी नगर आणी धम्मानंद नगर येथे {लोककर्म झोन 09} सिंमेट कॉक्रीट रस्त्यांचे कामास्तव स्थायी समिती ठराव क्र. 858 दि. 26/12/2016 अन्वये मंजूर असलेली मे. बिंद्रा कंस्ट्रक्शन यांची निविदा जी.एस.टी. करप्रणाली पुर्वीची असल्याने तसेच निविदा दरांचा वैधता कालावधी संपुष्टात आल्याने सदर निविदा रद्द करून फेरनिविदा मागविण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन फेर लघुनिविदा मागविण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 218:– प्रभाग क्र. १७–ब अंतर्गत राजाबक्षा श्री कुंभलकर ते श्री {लोककर्म झोन 04} वानखेडे, श्री. शेनाद ते श्री बनीया ते नेवारे ते श्री डाहाके यांचे घरापर्यंत सिमेंटीकरण करण्याच्या कामास्तव रू. ३१,३९,९३७/– च्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 219:– 2,000 लि. क्षमतेचे 1800 लि. LPM Pump क्षमता असलेले 4 {अग्निशमन विभाग} नग Small Water Fire Tender फेब्रिकेशन कार्याचे 18.73% कमी राशीची निविदा दर मंजूर करण्याबाबत.

मंजूर स्थायी समिती ठराव क्र. 732 दि. 18.11.2016 प्रमाणे विभागाने 4 नग स्मॉल वॉटर फायर टेंडरचे फेब्रिकेशन कार्यासंबंधात ई–निविदा मागविण्यात आली होती. या माध्यमातून 6 निविदाकारांची निविदा प्राप्त झाली.

निविदा तांत्रिक अटी–शर्तीची पुर्तता करणारे 1. M/s. Devi fire services, Solapur, 2. M/s. HI-Tech services, Pune 3. M/s. Wadia Body Builders, Ahmedabad या तिन्ही निविदाकारांचे निविदा दर उघडण्यात आले. ज्यामध्ये M/s. Wadia Body Builders, Ahmedabad यांचे सर्वांत निम्नतम निविदादर 18.73% कमी राशीचे रू. 80,00,000 (सर्व करांसहित) याप्रमाणे प्राप्त झाले.

करीता 2000 लि. क्षमतेचे 1800 लि. LPM Pump क्षमता असलेले 4 नग स्मॉल वॉटर फायर टेंडरचे फेब्रिकेशन कार्य M/s. Wadia Body Builders, Ahmedabad यांचेकडून निम्नतम निविदा दर रू. 80,00,000 प्रमाणे करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 220:– प्रभाग क्र. २(ड) मधील तक्षशीला नगर येथील नारी {लोककर्म झोन 09} घाटाची विकास कामे करण्याच्या रु. १,६०,००,०००/– रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करुन निविदा माविण्यास मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 221:— प्रभाग क्र. 19 ड अंतर्गत बजेरिया येथील रमेशचंद्र पिपलवा {लोककर्म झोन 06} मागे सिमेंट कॉक्रीट रस्त्याचे बांधकामास्तव तयार केलेल्या रू. 42,38,217/— रकमेच्या प्राकलनास पद क्र. A42001470511 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 222:— प्रभाग क्र. 18 ब लोकांच्या शाळेजवळ नागनदीची आर.सी.सी. {लोककर्म झोन 06} भिंतीचे बांधकामास्तव तयार केलेल्या रू. 34,98,559/— रकमेच्या प्राकलनास पद क्र. A42001374615 (770) अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 223:— मालमत्ता कर थकबाकीदारांकडून थकित मालमत्ता कर {कर विभाग} रक्कमेची वसूली करणेकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२८(३), (४) अन्वये संबंधीताची जंगम मालमत्ता अटकावून, स्थावर मालमत्ता जप्त करून विक्री करणेची तरतूद आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण VIII परिशिष्ट 'ड' कराधान नियम क्र.४२ ते नियम क्र.४७ अन्वये कसूरदारांची जंगम व स्थावर मालमत्ता जप्ती व अटकावणी कार्यवाही पासून ते विक्री पर्यंत राबवावयाच्या प्रक्रियेबाबत सुद्धा तरतूद आहे. मालमत्ता कर नियत कालमर्यादेत जमा न करणेचा कसूर करणाऱ्या कसूरदारांवर कार्यवाही करतांना संबंधीतांच्या मिळकतीची लिलाव प्रद्धतीने विक्री करणेकरीता आवश्यक नाममात्र बोली बोलण्यासाठी स्थायी समितीची पूर्व मान्यता कराधान नियम क्र.४७(७) अन्वये घेणे व कलम ४६६ (१) (ब) अन्वये स्थायी आदेश मंजूर करून घेणे गरजेचे असल्याने, स्थायी आदेशांना मंजूरी प्रदान करणेचा प्रश्न विचारात घेवून व आधारभूत मुल्यनिर्धारण करणेचा अधिकार झोन सहायक आयुक्त यांना अधिकार देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून एकमताने मंजूरी प्रदान केली.

तसेच नामपात्र बोली बोलणेसाठी वारंवार प्रकरण स्थायी समीतीच्या पूर्व मान्यता करीता सादर करावे लागू नये या हेतूने आयुक्त, महानगरपालिका यांना अधिकार प्रदान करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

परिशिष्ट-अ दुरुस्तीसह एकमताने मंजूरी प्रदान करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

## परिशिष्ट-अ

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४६६ (१) व (२) व कलम १२८ (४) यांच्या सहित आणि अनुसुचि 'घ' मधील प्रकरण ८ मधील नियम क्रमांक ४७ (५) अन्वये स्थावर जंगम मालमत्ता विकून महानगरपालिकेची थकबाकीची वसुली करण्याबाबतचे स्थायी आदेश.**

**१. अल्प शिर्षक :-**

**हया स्थायी आदेशाना नागपूर महानगरपालिका जंगम/स्थावर मालमत्तेची विक्री स्थायी आदेश असे संबोधण्यांत येईल.**

२. व्याख्या :-

विषयात किंवा संदर्भात काहीही प्रतिकूल नसल्यास या स्थायी आदेशात

अ. ''अधिनियम'' म्हणजे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ (५९/१९४९)

ब. ''नियम'' म्हणजे अधिनियमाला जोडलेल्या ड परिशिष्टामधील प्रकरण ८ मधील ''कराधान नियम''

क. ''आयुक्त'' या संज्ञेत आयुक्तांनी कलम ६९ (१) अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये या स्थायी आदेशातील वा नियमातील अधिकाराचा वापर करण्यास ज्यांना अधिकार प्रदान केले आहेत अशा अधिकाऱ्यांचा / कर्मचाऱ्यांचा समावेश होतो.

ड. ज्या संज्ञा व शब्द या स्थायी आदेशात वापरण्यात आलेले आहेत आणि ज्यांची व्याख्या देण्यात आलेली नाही त्यांचा अर्थ अधिनियम वा नियमात जो अभिप्राय आहे तोच धरण्यात येईल.

३. जाहिर लिलावाने विक्री करण्याबाबतचा जाहिरनामा :-

अ. नियम ४५ पोट नियम (१) जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेची जाहिर लिलावाने विक्री करण्याचा जाहिरनामा या स्थायी आदेशासोबतच्या नमुना ''अ'' मध्ये काढण्यात येईल.

ब. असा जाहिरनामा काढतांना कसूरदाराला या स्थायी आदेशासोबतच्या नमूना ''ब'' मध्ये नोटीस देण्यात येईल. त्यात विक्रीची तारीख, वेळ व जागा शक्यतो तंतोतंत व स्पष्ट पणे निर्देशित केली जावी. तसेच.

१. विक्री करावयाच्या मालमत्तेचे वर्णन नमुद असावे.

२. मालमत्तेवर आकारण्यात आलेले महसूल (कर) जर मिळकतीचा भाग असलेले महसूल ज्यांच्याकडून शासनाकडे भरले जातात त्या मिळकतीवर किंवा मिळकतीच्या भागावर आकारण्यात आलेले महसूल.

३. विक्री करावयाच्या मालमत्तेवर असलेला कोणताही प्रकारचा भार अधिभार वा बोजा.

४. ज्या थकबाकी वसुलीसाठी विक्री करणेबाबत आदेश देण्यात आलेला आहे ती थकबाकी रक्कम.

५. अशी आणखी कोणतीही माहिती ज्याबाबत आयुक्तांच्या मतानुसार खरेदीदारांना मालमत्तेची किंमत व खास माहिती होणे आवश्यक आहे ३ बाबी नमुद असाव्यात

४. जाहिरनामा प्रसिद्ध करण्याची कार्यपद्धती :-

अ. नियम ४५ पोट नियम (२) मध्ये तरतूद केल्यानुसार जाहिरमान्याची प्रसिद्धी केली जाईल.

ब. आयुक्तांनी निर्देश दिल्यास स्थानिक वर्तमानपत्रात हा जाहिरनामा प्रसिद्ध केला जाईल व अशा प्रसिद्धीसाठी झालेला खर्च हा थकबाकी वसुलीसाठी झालेला खर्च म्हणून समजण्यात येईल.

क. ज्या मालमत्तेची विक्री करण्याचा जाहिरनामा काढण्यात आला आहे ती वेगवेगळया भागात विकावयाची असली तरीही अशा मालमत्तेच्या अशा प्रत्येक वेगवेगळया भागासाठी स्वतंत्र व वेगळा जाहिरनामा काढण्याची आवश्यकता भासणार नाही.

ड. लिलावात भाग घेणाऱ्या इच्छुक व्यक्तींना आधारभुत मुल्यनिर्धारणाच्या रू. १०,०००/- रक्कम जमा करणे अनिवार्य राहील. कमाल बोली बोलणाऱ्या व्यक्तीकडुन २५ टक्के रक्कम वसुल करण्यात आल्यानंतर इतर बोली बोलणाऱ्या व्यक्तींकडुन वसुल करण्यात आलेली रक्कम तात्काळ परत करण्यात यावी.

प्रकरण कमाल बोली कायम करणेकरीता मा. आयुक्तांची मंजुरी प्राप्त करून घेउन उर्वरीत ७५ टक्के रक्कम कमाल बोलीधारकांकडुन वसुल करण्यात आल्यानंतरच Sale Certificate पंजीकृत करून घेणेकरीता पंजीकृत करण्याचा खर्च संबधीत कमाल बोलीधारकांकडुन जमा करून घेउन पंजीकृत Sale Certificate तामील करण्यात यावे.

५. विक्रीची वेळ.

विक्रीचा जाहिरनामा प्रसिद्ध केलेल्या तारखेपासुन १५ दिवसांची मुदत संपेपर्यंत कोणत्याही स्थावर मालमत्तेची विक्री करता येणार नाही.

६. विक्री :-

प्रत्येक स्थावर मालमत्तेची विक्री आयुक्तांनी त्याबाबतीत प्राधिकृत केलेला अधिकारी करील व अशी विक्री जाहिर लिलावाने केली जाईल अथवा आयुक्तांना आवश्यक वाटल्यास जाहीर प्रसिद्धी देउन बंद लिफाफ्यात देकार मागविता येतील.

७. विक्री संबधी इतर अटी :-

विक्री संबधी या स्थायी आदेशात वा इतरत्र उधृत न केलेल्या जाहिर लिलावाच्या पूर्वी किंवा नंतर वापरावयाच्या कार्यपद्धती संबधीच्या अटी आयुक्त विहीत करू शकतील. अशा अटी या स्थायी आदेशाचाच भाग समजण्यात यावा.

८. विक्री तहकूब करणे :-

कसूरदाराने किंवा त्यांच्यावतीने कोणी दुसऱ्या व्यक्तीने थकबाकीची रक्कम जाहिरनाम्यातील मालमत्तेची विक्री करण्याच्या वेळेपूर्वी केव्हाही अदा केल्यास वा थकबाकीचे पैसे भरल्यास महापालिकेतील अधिकाऱ्याकडील पावती वा प्रमाणपत्र सादर केल्यास सदर मालमत्तेची विक्री तहकूब केली जाईल. एखाद्याने चेक द्वारे भरणा केला तर तो म.न.पा. च्या खात्यात रक्कम जमा होई पर्यंत काय करावे ? चेक परत आल्यास काय होईल ? या बाबत तपशिल नमुद करणे योग्य.

९. विक्री लांबणीवर टाकणे :-

विक्री लांबणीवर टाकणेबाबत.

अ. आयुक्त किंवा विक्री करण्यास प्राधिकृत केलेली अधिकारी योग्य कारणासाठी विक्री लांबणीवर टाकू शकेल. मात्र अशा कारणाची लेखी नोंद ठेवावी लागेल.

ब. कोणत्याही खरेदीदाराची थकबाकीची रक्कम व विक्रीचा खर्च या पेक्षा कमी रक्कमेची बोली नाकारण्यात येईल व फेरविक्री संबधी नवीन जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात येईल.

क. ज्या प्रकरणात विक्री लांबणीवर टाकण्यात आली असेल अशा प्रत्येक प्रकरणी फेरविक्री संबधी नवीन जाहिरनामा प्रसिद्ध करण्यात येईल.

१०. कसूरदाराना रक्कम उभी करण्यासाठी गहाण वगैरे ठेवून संधी देण्यासाठी विक्री लांबणीवर टाकणेबाबत :-

अ. स्थावर मालमत्ता विक्री काढण्याचा जाहिरनामा काढल्यानंतर जर कसूरदाराने ती किंवा इतर मालमत्ता गहाणवट टाकून भाडयाने देउन किंवा अशा मालमत्तेची किंवा त्यातील काही भागांची विक्री करून किंवा इतर मालमत्तेची विक्री करून पैसा उभा करणार असल्याबद्दल आयुक्तांची खात्री पटवून दिली व तशा प्रकारे अर्ज दिल्यास त्याची पडताळणी करून आयुक्त कसूरदाराला पैसे उभे करण्यासाठी अशा मालमत्तेची विक्री काही कालावधी करीता स्थगित ठेवू शकतील. यासाठी अटी व शर्ती विहीत करण्यास आयुक्त सक्षम असतील.

ब. अशा प्रकरणात आयुक्त कसूरदाराला नियोजित गहाणवट, भुईभाडे पोटी किंवा मालमत्तेची विक्री करून वगैरे बाबतीत लेखी परवानगी देतील व येणे असलेली रक्कम विहित मुदतीच्या आत भरणा करण्यास परवानगी देतील.

अशा प्रकारे करण्यात आलेली बोझा विरहीत किंवा गहाणद्वारे नोंदणीकृत विक्री वा भाडयाने देण्याचे कृत्य या स्थायी आदेशान्वये जोपर्यंत आयुक्त त्यास परवानगी देणार नाहीत तोपर्यंत हा व्यवहार अंतिम झाला असे समजण्यात येणार नाही.

११. खरेदीदाराने भरावयाची अनामत आणि न भरल्यास पुनःविक्री :-

अ. मालमत्ता विक्रीच्या वेळी ज्या खरेदीदाराची बोली स्विकारली जाईल त्याने खरेदीच्या किंमतीपैकी २५ टक्के रोख रक्कम लिलाव करणाऱ्या अधिकाऱ्याकडे तात्काळ भरली पाहीजे अन्यथा ही मिळकत ताबडतोब परत विक्रीसाठी काढण्यात येउन तिची विक्री केली जाईल आणि पूर्वीच्या खरेदीदारास पुन्हा लिलावात भाग घेता येणार नाही.

ब. जेव्हा नियम ४७ (७) प्रमाणे आयुक्त स्वतः खरेदीदार असेल तेव्हा त्यास या स्थायी आदेशातील अटी लागू असणार नाहीत. (लिलावात भाग घेण्यासाठी काही ठराविक रक्कम सुरक्षा ठेव म्हणुन घ्यावी काय ?)

१२. खरेदीची संपूर्ण रक्कम भरण्यासाठी मुदत

स्थायी आदेश क्र. १६ व १७ मध्ये नमूद केलेली २० दिवसांची मुदत संपल्यानंतर ७ दिवसांचे आत अथवा ७ वा दिवस रविवार किंवा सुट्टीचा असेल तर त्या नंतरच्या लगतच्या कामाच्या दिवशी खरेदीदार खरेदीची उर्वरीत रक्कम महानगरपालिकेच्या कर्यालयात भरील.

१३. खरेदीची रक्कम भरण्यास कसूर केल्यास त्याचे परिणाम

वरील स्थायी आदेशामध्ये नमूद केलेल्या कालावधीमध्ये खरेदीची उर्वरीत रक्कम जमा करण्यास खरेदीदाराने कसूर केल्यास त्याने लिलावाचे वेळी जमा केलेल्या अनामत २५ टक्के रकमेतून विक्रीसाठी झालेला खर्च भागविण्यात येईल आणि उर्वरीत रक्कम महानगर पालिकेच्या निधीत जमा करण्यात येईल. त्यानंतर सदर मिळकतीची पुनर्विक्री करण्यात येईल. कसूरदार असलेल्या

खरेदीदाराला मिळकतीवर अथवा मिळकतीची विक्री करून मिळालेल्या रकमेच्या कोणत्याही भागावर हक्क राहणार नाही.

१४. पुनर्विक्री करणेबाबत नव्याने जाहिरनामा काढणे.

जर मालमत्तेच्या खरेदीची रक्कम मुदतीमध्ये न भरल्यामुळे मालमत्तेची पुनर्विक्री करावयाची वेळ आल्यास अशा प्रत्येक पुनर्विक्री बाबत नव्याने जाहिरनामा काढावा लागेल.असा जाहिरनामा काढण्याची पध्दती व कालावधीसाठी या स्थायी आदेशात यापूर्वी तरतुद केलेली विहित पध्दत वापरण्यात येईल.

१५. पुनर्विक्री अथवा नुकसान झाल्यास खरेदीदारावरील दायित्व.

अशा प्रकारे केलेल्या पुनर्विक्रीमध्ये पूर्वीच्या खरेदीदाराने दिलेल्या बोलीपेक्षा कमी किंमत आल्यास सदर दोन किमंतीमधील फरक आणि पुनर्विक्रीसाठी झालेला सर्व खर्च पूर्वीच्या खरेदीदाराकडून मिळकत कराची थकबाकी समजून वसूल केला जाईल.

१६. विक्री रद्दबादल करण्यासाठी अर्ज करणे.

अ. जेंव्हा या स्थायी आदेशानुसार स्थावर मालमत्ता विक्री केली जाईल त्या दिवसनंतर २० दिवसांचे आत सदर मिळकतीचा मालक अथवा सदर मिळकतीच्या विक्रीपूर्वी सदर मिळकतीमध्ये कोणतेही हितसंबंध असलेली व्यक्ती सदर विक्री रद्दबादल ठरविण्यासाठी अर्ज करू शकेल मात्र त्यापूर्वी खालीलप्रमाणे रोख रक्कम महानगरपालिकेच्या कार्यालयात जमा करावी लागेल.

१. खरेदीदाराला देण्यासाठी खरेदी किंमतीचे ५ टक्के रक्कम

२. त्यासाठी लिलावाने विक्री करण्याचे आदेश झाले होते ती जाहिरनाम्यात नमूद केलेली परंतु महानगरपालिकेत जमा केलेली रक्कम लिलावाच्या जाहिरनाम्यानंतर वजा जाता उरलेली रक्कम.

ब. एखादया व्यक्तीने स्थायी आदेश क्र. १७ अन्वये विक्री रद्दबादल ठरविण्यासाठी दिलेला अर्ज मागे घेतल्याशिवाय या स्थायी आदेशाअन्वये अर्ज करण्याचा अथवा तक्रार दाखल करण्याचा तिला हक्क असणार नाही.

क. लिलावाच्या जाहिरनाम्यात उल्लेख नसलेल्या खर्चाची वा व्याजाची रक्कम देण्याची जबाबदारी कसूरदारावरच राहील.

१७. फसवणूक अथवा अनियमितपणा यावरून विक्री रद्दबादल ठरविण्यासाठी करावयाचा अर्ज.

लिलावाच्या तारखेनंतर २० दिवसाचे आत कोणतीही व्यक्ती स्वतःच्या हितसंबंधास अशा विक्रीमुळे बाधा पोहचली आहे वा लिलावाच्या प्रसिद्धीमध्ये अथवा लिलावाने विक्री करण्यामध्ये फसवणूक अनियमितपणा अथवा चूक केली वा झाली आहे या कारणावरच रद्दबातल ठरविण्यसाठी अर्ज करू शकेल.

मात्र आयुक्तांची अशा फसवणुकीमुळे अनियमितपणामुळे अथवा चुकीमुळे अर्जदाराच्या हितास कशाप्रकारे बाधा पोहचत आहे व त्यामुळे त्याचे काय नुकसान होत आहे याबद्दल अर्जदाराने आयुक्तांची खात्री पटवून देणे आवश्यक राहील.

१८. विक्री रद्दबादल ठरविण्याचे आयुक्तांचे अधिकार .

आयुक्तांस स्वतःचे अधिकारात आवश्यक ती कारणे लेखी नोंदवून लिलाव विक्री रद्द करता येईल मग अशी विक्री रद्दबादल ठरविण्यासाठी त्यांचेकडे अर्ज केलेला असो अथवा नसो.

**१९. विक्री केव्हा कायम किंवा रद्दबादल ठरविली जाईल.**

**अ. स्थायी आदेश क्रमांक १६ व १७ अंतर्गत कोणताही अर्ज केलेला नसेल किंवा असा केलेला अर्ज नामंजूर केल्यावर आयुक्त अशी विक्री कायम करण्यात आल्याचे आदेश जारी करतील आणि त्यानंतर ती विक्री कायम व अबाधित समजण्यात यावी.**

**ब. जेव्हा असा अर्ज मंजूर केला जाईल किंवा स्थायी आदेश क्रमांक १६ खाली केलेल्या अर्जाचे प्रकरणी स्थायी आदेशामध्ये नमूद केलेल्या २० दिवसांचे मुदतीत आवश्यक रक्कम भरण्यात आलेली असेल तर आयुक्त अशी विक्री रद्दबादल ठरविण्याचे आदेश करतील.**

**मात्र असे आदेश काढण्यापूर्वी असा अर्ज केल्यामुळे ज्या व्यक्तीस बाधा पोहचणार असेल त्यांना त्याबाबत नोटीस देणे आवश्यक राहील.**

**२०. काही प्रकरणात खरेदीची किंमत परत करणे.**

**जेव्हा स्थायी आदेश क्रमांक १९ अन्वये विक्री रद्दबादल ठरविण्यात आलेली असेल तेव्हा खरेदीदारास त्याने भरलेली खरेदीची रक्कम परत मिळण्याचा अधिकार असेल.**

**२१. खरेदी बाबतचे प्रमाणपत्र.**

**जेव्हा एखादया स्थावर मालमत्तेची लिलाव विक्री परिपूर्ण समजण्यात येईल आणि खरेदीदाराने आवश्यक ते स्टॅम्पपेपर सादर केले असतील तर अशा विक्री करण्यात आलेल्या मिळकतीची माहिती आणि अशी मिळकत खरेदी करणाऱ्या व्यक्तीचे नाव नमूद केलेले प्रमाणपत्र आयुक्त त्यास अदा करतील आणि अशा प्रमाणपत्रावर विक्री परिपूर्ण झाल्याची तारीख नमूद केलेली असेल. (नमुना ‘‘क’’)**

**२२. मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्क खरेदीदाराणे भरणे बाबत.**

**‘‘वर निर्देशित प्रमाणपत्रा बाबतचे मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्क इत्यादी सर्व खर्च खरेदीदारास करणे बंधनकारक राहील.’’**

**२३. खरेदीदाराचे मिळकतीवरील मालकी हक्क.**

**जेव्हा या स्थायी आदेशाखाली मिळकतीची विक्री करण्यात येईल आणि अशी विक्री परिपूर्ण कायम करण्यात आलेली असेल तेव्हा अशी मिळकत तिची विक्री झाल्यापासुन खरेदीदाराच्या मालकीची झाल्याचे समजण्यात येईल.**

**२४. विक्रीतुन मिळालेल्या रक्कमेचा विनियोग.**

**जेव्हा लिलाव व विक्री पूर्ण होईल तेव्हा अशा विक्रीपासुन मिळालेल्या रकमेतून प्रथम विक्रीसाठी झालेली खर्चाची रक्कम व त्यानंतर थकबाकीची रक्कम वळती करून उर्वरीत रक्कम थकबाकीदाराचे नावे महानगरपालिकेच्या आय शिर्षात जमा करण्यात येईल.**

**२५. अधिनियमाच्या अनुसुचीमधील नियम.**

**अधिनियमातील ड अनुसुचीच्या प्रकरण आठ मधील स्थावर मिळकतीचे विक्रीसाठी लागु असलेले नियम आवश्यक त्या फेरबदलासह** (mutatis mutandis) **लागू राहतील.**

**२६. मालमत्ता भोगवटदाराच्या / भाडेकरूच्या भोगवटयात आहे व सदर मालमत्तेवर कर थकीत आहे अशा मालमत्तेवर कर भरण्याची प्रथमतः जबाबदारी असलेली व्यक्ती मालमत्ता कर म.न.पा.स देत नाही व भोगवटदारास मालमत्ता कराचे देयक देण्यात आले असेल अश्या प्रकरणी भोगवटादार / भाडेकरू प्रथमतः जबाबदार असलेल्या व्यक्तीस देत असलेल्या भाडयाच्या रक्कमेतुन थकीत**

मालमत्ता कराची रक्कम वसुल करण्यात येईल व त्याबाबतची नोटीस नमुना 'ड' मध्ये भोगवटदारास / भाडेकरूस देण्यात येईल.

२७. **भोगवटादारांना मालमत्ता कर देण्याबद्दल केव्हा जबाबदार धरता येईल.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १४० अंतर्गत या अधिनियमाच्या तरतुदीस अधिन राहून अशा भोगवटादारास मालमत्ता कराच्या रक्कमेकरीता बिल देता येईल किंवा अशा जागेचे दोन किंवा अधिक भोगवटादार असतील तर, त्यापैकी प्रत्येकावर संपूर्ण रक्कमेसाठी देय असलेल्या रक्कमेच्या भागाकरीता कराच्या एकूण रक्कमेशी एक किंवा अनेक भोगवटदारांच्या जागांच्या अशा भागालाही देय असलेल्या रक्कमेवरील बील देता येईल.

अशा भोगवटदार किंवा भोगवटदारांपैकी कोणीही असे कोणतीही बिल दिल्यापासुन तीस दिवसांच्या आत मागणी केलेली रक्कम नियमानुसार खालीलप्रमाणे त्यांचेकडुन वसुल करता येईल.

I. भोगवटदार भाडेकरू असल्यास व मालमत्ता मालकाचे देणे असलेले घरभाडे रक्कम जप्त करून मालमत्ता कर थकीत रक्कम वसूल होण्याजोगे असल्यास घरभाडे रक्कम महानगरपालिकेत देण्याविषयी संबंधीत भाडेकरू भोगवटदारास फर्माविण्यात यावे.

II. मालमत्ता कर थकीत रक्कम ही घरभाडे रक्कम जप्त करून महानगरपालिकेच्या खात्यात जमा करून सुध्दा पूर्णत: वसूल होण्याजोगी नसल्यास कलम १४१ चा वापर करून मालमत्ता कर थकीत रक्कम वसूल करणेबाबत कार्यवाही करण्यात यावी.

# नागपूर महानगरपालिका नागपूर.

नमुना ''अ''

(स्थायी आदेश क्र. 3 (अ) पहा)

ज्या अर्थी श्री. .............................................................................................................. ................यांनी वर्ष .............................. ते ................................. या कालावधीसाठीची नागपूर महापालिकेचा कर बाकी रू. ............................. (अक्षरी रूपये ............................ .......................................................) अदा केले नाहीत.

आणि ज्या अर्थी महाराष्ट्र महापालिका अधिनियम 1949 च्या अनुसुचि ड प्रकरण 8 च्या नियम 45 पोटनियम (1) अन्वये श्री. ......................................................... ......................... यांची खाली वर्णन केलेली मालमत्ता कराच्या बाकी वसुलीसाठी जप्त करण्यात आली आहे.

त्या अर्थी या जाहिरनाम्याद्वारे जाहीर करण्यात येते की, महाराष्ट्र महापालिका अधिनियमाच्या कलम 128 पोटकलम 4 च्या तरतुदीनुसार अधिकाऱ्यांचे पदनाम मा. .................................................................... नागपूर महानगरपालिका हे दि. ............................................... रोजी ....................................... या वेळात ....................... ............................. या ठिकाणी पुढील परिशिष्टात नमूद केलेल्या शर्तीवर श्री. ................................................................................................ यांचा खाली नमूद केलेल्या मालमत्तेवर हक्क हितसंबध आणि मालकी यांची जाहीर लिलावाने विक्री करतील.

स्थावर मालमत्तेचे वर्णन

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

मा. महापालिका आयुक्त

नागपूर महानगरपालिका, नागपूर.

# नागपूर महानगरपालिका नागपूर.

## नमुना ‘‘ब’’

(स्थायी आदेश क्र. 3 (ब) पहा)

प्रेषक : ................................................................................
................................................................................
................................................................................
(आदेशाची तामिली करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव व पदनाम)

प्रति,
श्री. ..............................................................................
..............................................................................
..............................................................................
(कसुरदार व्यक्तीचे नाव, पित्याचे नाव, पूर्ण पत्ता)

आपणास याद्वारे सूचित करण्यात येत आहे की, सोबत जोडलेल्या जाहीरनाम्यात वर्णन केलेली आपली मालमत्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 128 उपकलम (4) अन्वये जप्त करण्यात आलेली आहे. सदर मालमत्तेची खाली दर्शविलेल्या तपशीलाला अनुसरून जाहीर लिलावाने विक्री करण्यात येईल.

ठिकाण : ..............................................................................

..............................................................................

तारीख : ........................... महिना ....................... वर्ष .......................

वेळ : ..............................................................................

नमुना ‘‘अ’’ मधील जाहीरनामा सोबत जोडलेला आहे

नागपूर

दिनांक : ......................................

प्राधिकृत अधिकारी

महानगरपालिका, नागपूर.

# नागपूर महानगरपालिका नागपूर.

## नमुना ''क''

(स्थायी आदेश 21 पहा)

खरेदीचे प्रमाणपत्र

या द्वारे प्रमाणित करण्यात येते की, श्री./श्रीमती ................................................ ................रा. ............................................................................................................ ............................... यांनी खाली वर्णन केलेली मालमत्ता .................................................. ........ या तारखेस करण्यात आलेल्या जाहीर लिलावात रू. ........................ (अक्षरी रूपये .............................................................................................................. .................................. मात्र) या मिंमतीत विकत घेतलेली आहे.

मा. आयुक्त, नागपूर महानगरपालिका नागपूर यांनी विक्री व्यवहारास ............ ................या तारखेस मान्यता दिलेली आहे.

या विक्री व्यवहाराद्वारे श्री./श्रीमती ........................................................................ ................. (पती/पित्याचे नाव ............................................................................................ .) राहणार .......................................................................................................................... .................................................... यांचे नावे सदर मालमत्तेचे मालकी व हितसंबंध व हस्तांतरीत होत आहेत.

## मालमत्तेचे वर्णन

| मालमत्तेचे अचूक स्थान (चतःसिमा सह) | मालमत्तेचे वर्णन | मालमत्तेच्या मालकाचे पूर्ण नावं |
|---|---|---|
| 1 | 2 | 3 |
| | | |

तारीख :
नागपूर

आदेश देणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव
पदनाम, हस्ताक्षर

# पंचनामा

आम्ही खाली सहया करणार पंचलोक पंचनामा लिहून देतो की, श्री ..............
..........................................................................................................................................
................ यांचेकडे ब्लॉक नं. ........................... घर नं. .......................... मालमत्ता क्र. .......................... या घरावरील ................................. 31 मार्च 20 ...................... अखेर म्युनिसिपल कराची बाकी रूपये आहे. सदर रकमेबद्दल डि.मो.नं. ....................... ....................... दि. ........../............/20.......... काढून ती दिनांक ........../............/20. ......... ला बजावण्यात आली.

तरी सदर डिमांड नोटीसची रक्कम आज पावेतो पूर्ण भरण्याची तजबित केली नाही. तरी आज रोजी सदर रकमपोटी वॉरंट काढण्यात आलेले आहे. सदर वॉरंट रकमेपोटी खालील वर्णन केलेली मालमत्ता जप्त केलेली आहे.

जप्त मालाचे / मालमत्तेचे वर्णन

वरील पंचनामा आमचे समक्ष करण्यात आला असून आम्ही कोणाचीही भीडभाड न ठेवता लिहून दिला. पंचनामा वाचून सही केली.

दिनांक : ........../............/20.......... वेळ :

पंचाच्या सहया

1) ...................................................................

2) ...................................................................

सक्षम

वॉरंट क्लार्क
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

# नागपूर महानगरपालिका, नागपूर.

(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील प्रकरण 8 नियम नं. 45 अन्वये)

## हुकुमनामा

वार्ड नं. ........................................................ टि.नं. ..............................................................

सि.स.नं ......................... मधील मिळकतीवर 31.03.20....... अखेर रूपये .......................

............................................................ कराची बाकी आहे. त्याकरिता श्री. .......................

........................................................................... यांचे नावावर असलेले घर / मिळकत जप्त करण्याचा हुकुम आहे. तरी या हुकमान्वये घरमालकास / मिळकत मालकास सदर विक्री, गहाण, दान वगैरे अन्य तऱ्हेने तबदील करणेस बंदी घालणेत येत आहे. तसेच सर्व लोकास इसम मजकूर यांचेपाशी सदर मिळकतीसंबधी खरेदी, गहाण, दान व बोजा वगैरे अन्य तऱ्हेने तबदील करून प्रतिबंद घालण्यात येत आहे.

कसुरदाराने मिळकतीवरील कराची थकबाकी वसुलीच्या खर्चासह 21 दिवसाचे आत भरली नाहीतर मिळकत विक्री केली जाईल.

नागपूर,

दिनांक :

उप आयुक्त
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

# नागपूर महानगरपालिका नागपूर.

नमुना ''ड''

(स्थायी आदेश क्र. 26 पहा)

(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 मधील प्रकरण 8 नियम 52 अन्वये)

श्री / श्रीमती ..........................................................................................................

रा. ..........................................................................................................................

.................वार्ड क्र. ................................................ घर क्र. ....................................................

ही मालमत्ता श्री / श्रीमती .......................................................................... .......................................... यांच्या नावे असुन या ठिकाणी आपण भोगवटादारास / भाडेकरू वास्त्यव्यास आहात या मालमत्तेवर 31.03.20.... अखेर पावेतो रू. ................ ................... (अक्षरी .......................................................................................................... ....................................) कराची रक्कम बाकी आहे. थकीत कराच्या रक्कमेचे देयक आपणास यापुर्वी दि. .......................... या रोजी तारखेस देण्यात आलेले आहे.

याद्वारे आपणास कळविण्यापत येत आहे की, आपण मालमत्ता धारकास देत असलेल्या प्रतिमाह भाडयाची रक्कम थकीत मालमत्ता कराच्या रकमेची पुर्ण वसुली होईपर्यंत म.न.पा.च्या खात्यात जमा करावी. असे भाडे महानगरपालिकेस देण्यास आपण कसुर केल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 140 (1) अन्वये आपण मालमत्ता धारकास देत असलेल्या भाडयाची रक्कम मालमत्ता कराची थकबाकी आहे असे समजुन आपणाकडुन वसुल करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सहा. आयुक्त
महानगरपालिका, नागपूर.

See rule 46 of the chapter VIII of the MMC Act.
Certificate of Sale
(For Moveable Property)

Where as

The undersigned being the authorised officer of the Nagpur Municipal Corporation, Nagpur under the Maharashtra Municipal Corporation Act and in exercise of the power confirmed under chapter VIII rule 46 and 49 has in consideration of the payment of Rs. ………………… sold of purchaser ………………………………………………………

Description of the moveable property.

The following moveable property the undersigned acknowledge the receipt of the sale price in full and possession of the item above.

Authorised Signature

Date and time

Place

ठराव क्रमांक 224:— सी. सी. रोड फेज–2 अतंर्गत नागपूर शहरातील रस्त्याचे {सामान्य प्रशासन विभाग} सिमेंटीकरण करण्याकरीता 11 महिन्याच्या कंत्राटी तत्वावर अनुज्ञेय पारिश्रमीक मासिक वेतनावर पदवीधर साईट इंजिनिअर, पदवीकाधारक सुपरवाईजर, आय.टी.आय. धारक सुपरवाईजर यांचे जाहिरात क्र. 292/पी. आर. दि. 27/09/2016 नुसार प्रत्यक्ष मुलाखती घेवुन नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात आले होते.

कंत्राटी तत्वावर नियुक्त करण्यात आलेल्या एकुण 39 कर्मचाऱ्यांचा 11 महिन्याच्या नियुक्तीचा कालावधी दि. 23/10/2017 ला संपला असल्यामुळे व विभागाचे शिफारसीनूसार व आवश्यकतेनुसार त्यांना दोन दिवसाचा तांत्रीक खंड देणेबाबत तसेच दि. 09/02/2018 ला व दि. 05/03/2018 ला नियुक्तीची मुदत संपणाऱ्या एकुण 09 कर्मचारी असे एकुण 39 + 9 = 48 कंत्राटी कर्मचाऱ्यांना दि. 31/03/2018 पर्यंत मुदत वाढ देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 225 :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

| | |
|---|---|
| निगम सचिव<br>महानगरपालिका,नागपूर | सभापती<br>स्थायी समिती,<br>महानगरपालिका,नागपूर |